# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-10.09.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>पदवीदान</u>**

कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलांच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी 'आजीवन विद्यार्थी' राहून सातत्यानं नवी कौशल्ये आत्मसात करावीत. ज्ञानासोबत सामाजिक जबाबदारी स्वीकारण्याचा हा महत्त्वाचा टप्पा आहे, असं प्रतिपादन राज्यपाल तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी आज केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२७ व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह विद्यापीठाशी संबंधित विविध समित्या आणि संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते. या आज पार पडलेल्या सोहळ्यात ६ सुवर्णपदके, ४४६ पीएच.डी. पदव्या, तसंच १ लाखांहून अधिकपदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

**<u>परीक्षाविधीन प्रशिक्षण</u>**

पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी अर्थात यशदा इथं आज राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांनी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. नागरी सेवेत काम करताना देशाच्या राज्यघटनेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासोबतच प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, लोकाभिमुखता आणि निर्णय घेण्याचे धैर्य या मूल्यांना आपल्या कार्याचा आधार बनवावं, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी प्रशिक्षणार्थींना केलं.

**<u>स्पर्धापरीक्षा संवाद</u>**

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी उच्चस्तरीय टास्क फोर्स अर्थात कृती दल स्थापन करण्यात आलं आहे. या दलाकडून येत्या शनिवारी १२ सप्टेंबरला पुण्यात स्पर्धा परीक्षा विद्यार्थी, उमेदवार तसंच भरती परीक्षा प्रक्रियेशी संबंधित विविध घटकांशी थेट संवाद साधण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सकाळी १० ते सायंकाळी ५.३० या वेळेत ही सल्लामसलत होणार आहे.

**<u>Intro VC</u>**

आज जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आहे. जगभरात दरवर्षी ७ लाखांहून अधिक लोक आत्महत्येने मरण पावतात. जगात आत्महत्या हे मृत्यूचं तिसरे मुख्य कारण आहे. कनेक्टिंग ट्रस्ट ही स्वयंसेवी संस्था गेली २१ वर्षे आत्महत्या प्रतिबंधासाठी कार्यरत आहे. ह्या संघटनेमध्ये काम करणाऱ्या पूजा कडू यांनी या दिनानिमित आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली....

**मेट्रोवाढ**

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पुणे मेट्रोकडून फेऱ्यांची संख्या आणि सेवेच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या काळात गर्दीच्या वेळी संपूर्ण मेट्रो मार्गावर दर पाच मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध राहणार आहे.गणेशोत्सवात मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी गर्दी टाळण्यासाठी जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकात मार्गिका बदलणं टाळावं, असं आवाहन महामेट्रोकडून करण्यात आलं आहे

**पर्यावरणपूरक मूर्ती**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांना आपल्या सण-उत्सवांची आणि संस्कृतीची ओळख व्हावी, या उद्देशाने पुण्यात आयोजित केलेल्या 'गणेशमूर्ती कार्यशाळा आणि स्पर्धे'ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात पुणे परिसरातील ३०० विद्यार्थी सहभागी झाले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध मूर्तिकार विनोद येलारपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाडू मातीपासून आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या.

**डास निर्मूलन**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शहरात साथरोग नियंत्रणासाठी डास-उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याची धडक मोहीम राबवली जात आहे. पावसाळ्यात कीटकजन्य आजार रोखण्यासाठी नियमित सर्वेक्षण, औषध आणि धूरफवारणीवर भर दिला जात आहे. या कामासाठी सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांना स्वतंत्र वाहने पुरवण्यात आली असून, नव्याने समाविष्ट गावांमध्ये अतिरिक्त कंत्राटी मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे.

**पाऊसतूट**

राज्यात यंदाच्या मान्सूनमध्ये पावसाचे प्रमाण असमान राहिले असून, जूनपासून पूर्ण राज्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे ८२ टक्के पाऊस झाला आहे. कोकण विभागात पावसाची स्थिती तुलनेने समाधानकारक असली तरी पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी आहे. त्यामुळे काही भागांत शेती आणि पाणी उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज हवामान मुख्यतः सूर्यप्रकाशित होतं. कमाल तापमान ३१ तर किमान २१ अंश सेल्सियस दरम्यान होतं. उद्याही साधारण असंच हवामान राहण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**